# प्रभुतरुण

| वर्ष ४९ | अंक १० | मुंबई | एप्रिल २०१६ | पाने ६ | किंमत रु. १ |
|---|---|---|---|---|---|

*(स्थापना : तारीख २५ ऑगस्ट १९२३)* **तत्त्वाचा बंदा जीव । मूर्तीला कोण विचारी?**

**www.prabhutarun.org**

*संपादिका:* **सुहासिनी कीर्तिकर** *कार्यकारी संपादक मंडळ :* **मिनाक्षी जयकर, मयुरा नायक, संजना कोठारे, वैजयंती कीर्तिकर**

*सहाय्यक संपादक:* **त्वरिता दळवी, राजेश नवलकर, भक्ती शेटचे**

*संपादकीय*

## कसं जगायचं?

**—सुहासिनी कीर्तिकर**

शालूताई तशा कष्टाळू. आपल्या नवऱ्याच्या निधनानंतर तर त्यांना अधिकच कष्ट करावे लागले. पदरी तीन मुलं. शाळेत जाणारी. सासूचीही जबाबदारी होतीच. अशावेळी एवढंसं 'फॅमिली पेन्शन' किती आधार देणार? त्यांनी 'लोकं काय म्हणतील?'ची भीडभाड न ठेवता घरोघरी दुधाच्या पिशव्या टाकायला सुरूवात केली. स्वत: अभण. त्यामुळं पत राखून काही कचेरीत काम करायची सोयच नव्हती. मग त्यांच्या लक्षात आलं की सकाळच्या दुधाच्या कामातून मोकळं झालं की दिवस हातचाच रहातो. शेजार पाजारची मुलं शाळेला जातात. त्यांना पोचवण्याचं काम का करू नये? इतर अनेकांनीही शालूताई विश्वासाची बाई; म्हणून आपापली मुलं त्यांच्या स्वाधीन केली. मुलांना घरून शाळेत अन् शाळेतून घरी आणून सोडणं म्हणजे ताईंना आनंदच. एकेकावेळी त्या मुलांचा घोळका घेऊन चांगली साताठ मुलं नेआण करीत. घरचं सगळं आवरून, सासुला सावरून हे कामदेखील त्यांना संसारासाठी हातभार लावू लागलं. हळूहळू त्यांची स्वत:ची मुलंही मोठी झाली. खूप छाऽऽन नाही; पण त्यांच्या दोन मुलींनी स्वत:च आपआपला जोडीदार शोधला. होत्या घरात तोवर आलटून पालटून त्या स्वयंपाकाचंही बघत, आजीला सांभाळत. मग शालूताई, सासू, मुलगा एवढेच उरले त्या घरात. मुलांची ने आण करताना झालेल्या ओळखीतून त्या मग काही घरी चपात्या लाटायला जाऊ लागल्या, काहींना मोजके जेवणाचे डबे पुरवू लागल्या. त्यांच्या शांत, हसऱ्या स्वभावामुळे चरितार्थासाठी त्यांना फार धडपड करावी लागली नाही. म्हणजे कष्ट केले त्यांनी; पण 'शालूताई' म्हणून जनमानसात सन्मानही मिळवला. हलकेहलके यांच्या कष्टांचं चीज होत नवऱ्याच्या पाठी घर त्यामुळे उभंही राहिलं. मुलगा शाम्या बी.कॉम. झाला. मुली नाही शिकल्या; पण शाम्या 'ग्रॅज्युएट' झाला! त्याला 'कॉमर्स' विषय चांगलाच कळला! त्याने स्वत:चाच 'ट्युशन क्लास' सुरू केला. दणदणीत यशाचा मार्ग! खणखणीत पैसे मिळवायचा धंदा. मग त्यानं शेजारची खोली विकत घेतली. तेथे 'शाम क्लासेस'ची पाटी लागली. त्यानं आईला म्हटलं, 'आई, आता हे दूध पोहोचवणं, चपात्या करणं वगैरे थांबव आता. खूप केलंस बाबांच्या मागे.' शालूताईंना अभिमान वाटला मुलाचा. वाटलं; आता आपणही 'सासू' व्हायला हवं. त्यांनी आपली मिळकतीची काम बंद करून टाकली. दरम्यान सासूबाई कसलंसं निमित्त होऊन गेल्या. उरलं कोण? श्याम्या आणि त्याच. रीतसर त्याचं लग्न झालं. सून आली. इथवर झालेला सगळा संसारप्रवास त्यांच्या कर्तृत्वाचा होता, कष्टाच्या कमाईवर त्यांनी घर उभं केलं होतं.

सत्तर ऐंशीच्या दशकातली ही गोष्ट. शालूताईंची सून घरात आली तेव्हा घराचं चित्र तसं समृद्धीचं होतं. पण तिनं आल्या आल्या घराचं कर्तेपण घेतलं अन् आजपर्यंतची शालूताईंची कामगिरी तुच्छ ठरत गेली. तिनं घरात स्वयंपाकाला बाई ठेवली. इतरांघरी पोळ्या करता करता घरी अन्नपूर्णेचं काम करणाऱ्या शालूताई रिकाम्या रिकाम्या झाल्या. बरं; ती स्वयंपाकाला मावशीबाई यायची, ती शालूताईंशी बरोबरीनं वागायची. बरोबरच होतं ते. कारण इतकी वर्षे शालूताई तेच करायच्या. मग सुनेची कुरबुर. 'यांना काऽऽही कळत नाही. मी सकाळी चहा करते. तोच गरम करून द्यायचा नं! पण या 'आई' मावशीताईंना सासूसारख्याच मान देतात.' हळुहळू मावशीबाई आल्या की स्वत:च्या खोलीतून

(पान २ कॉलम १ वर)

*विस्तारीत संपादकीय*

## Life Begins at 40!

**-मयुरा गुंजारव नायक**

Every time we round up our age at 20 or 30 or 40… our folks will comment on our landmark age! Oh! You have turned 20.. Finally moving out of your teens…. 30?? Oh the youth is passing!! Really?? I am in my mid 30s and it seems to be the best time of my life! But I was supposed to move out of my youth, and here I am feeling as young, energetic, and vibrant as ever…. The Optimist that I am, if I have to die at 80, then I am not even midway!! But I have learnt so much that for the rest of my life I have to only apply those learnings and I probably will sail through a very happy life!! Sounds so good to be true!!

This year, my significant other half turns 40! And I am taking this as a reason to celebrate!! A lot of our friends thought I was silly to throw a bash for his 40th… he is not turning 50!! Why are you in a hurry! Well my father-in-law celebrated my 25th birthday with as much gusto telling me that it was indeed a landmark year… he told me then, that for you it is a landmark year you are beginning a new life with a new family (we got married six months before my 25th birthday) and you have begun what seems to be a great career for you! We have all the reasons to celebrate… As usual I agreed.. Anyway he did not live to see me turn 30, so I am glad we celebrated. I think celebrations need no reasons! Rather if the reason walks up to you, then might as well celebrate. The time is always right when the time is NOW…. To me 40 seems like a mid-point perfect time to celebrate the youth while it exists and early days to the wisdom that comes with the grey hair!! A perfect gathering to get your parents, family and friends together!

At 40 when you look back, the first 20 years of growing up, schooling and higher education altogether seem like just the kindergarten years. Kindergarten – When life seems carefree, we have our parents to manage us right from getting us our clothes to our pocket money and ensuring that we do something with our lives!! Those 20 years we yearn for our freedom. We keep waiting for the day we will have our first salary deposited in our independent Salary Account! Our first tryst as we assume with the flavour of independence! But that's really when the struggle starts… Most of us have a paradigm shift in our lives as we move steadily up the corporate ladder. We are out of our protected cocoon meeting new people, making new friends and there starts a whole new rollercoaster of a ride! From the mid 20s till the mid 30s we are busy making a life out of the platform that most fortunate of us got from our parents personally as well as professionally.

40 seems to be that age, when most have chosen their path in career as well as personal life, achieved certain milestones, made enough mistakes and risen above those, seen enough failures and enjoyed success!! This seems to be an interesting age at the median. Gunjar is exactly there and I feel he has reached that age of his life where I would like him to reap all that he sowed!! They say life begins at 40… the first 40 years of childhood are the toughest, as up till then we are only doing research!! Research!! And how!!

I am not so used to calling him Gunjarav… most of his friends and colleagues either call him Gunjar or Gunjaa… and so do I. His parents fondly named him "Gunjarav" ! I have myself explained this to so many people I introduced him or his mention to, and I am sure he got a chance to celebrate his exclusive name innumerable times in his life. So for the records – Vihang (his dad) means a bird and Madhuri (his mom) means sweetness, therefore Gunjarav means "Sweet humming of a bird". That makes

(पान २ कॉलम ३ वर)

संपादकीय

(पान १ कॉलम २ वरून)

बाहेर यायला शालूताईंना बंदी झाली. ‘यांना मॅनेजमेंट कळतच नाही.’ असा शेरा मिळू लागला. पुढं यथावकाश शालूताईंना नातवंडं झाली. त्यांना हातही लावायचा नाही! का? तर ‘चाईल्ड सायकॉलॉजी’ त्यांना म्हणे कळत नाही! मोठ्या नातवाला ‘प्ले ग्रुप’ला टाकलं तेव्हा शालूताईंना कोऽण आनंद झाला. इतरांची मुलं शाळेत पोहोचवली. चला. आता माझ्या नातवाचं बोट धरून मी त्याला ‘लिटल् वंडर’ मध्ये घेऊन जाईन. पण... पण त्या नातवाला न्यायला आणायला एक ‘मिनीबस’ ठेवली गेली. त्या बसपाशी पोचवायला, तो बसमध्ये चढला की त्याला ‘फ्लाईंग किस’ द्यायला त्याची आई त्याला स्कूटीवरून घेऊन जाऊ लागली. शालूताई आपल्या त्याचा डबा बॅगमध्ये भरायच्या तेवढ्याच. एक दिवस शामजवळ सुनेनं तक्रार केली. ‘मी करत्ये नं सगळं मॅनेज? या कशाला ढवळाढवळ करतात? यांना मॅनेजमेंट आधी जमत नाही. त्यांनी शांतपण बसावं नं टी.व्ही. बघत!’ शाम बिचारा कसंबसं म्हणाला, ‘मॅनेजमेंट जमत नाही म्हंजे गं? तिनं वेगवेगळी कामं करून आम्हाला पायावर उभं केलं ते सगळं नीट मॅनेज करूनच नं?’’ तर ठसक्यात उत्तर आलं, ‘‘त्याला ढोरासारखं कष्ट करणं म्हणतात. मॅनेजमेंट नाही. इतरांकडून कामं करवून घेणं याला मॅनेजमेंट म्हणतात. काय पण पुळका तुला आईंचा!’’

शालूताई स्वत:च उभं केलेल्या घरात ‘मिसमॅनेज’होत एकट्या एकट्या पडत गेल्या. आता सुखसोयी होत्या. टी. व्ही. होता. फ्रिज घेतला मुलानं. गाडी आली दाराशी. पण ऐंशी नव्वदच्या दशकात सत्तरऐंशी वयाच्या शालूताईंना ना सुख मिळालं, ना स्नेहसोबत. नातवंडं मोठी झाली ती ‘मम्मी पप्पा’ संस्कृतीत. आजीचं निरक्षरपण अगदीच अडाणी ठरलं त्यांच्यालेखी. खायला द्यायला मावशीबाई. आजी काय कामाची? बरं, इतक्या वर्षांच्या कष्टांनी शालूताईंचं शरीरही रापलेलं. सुनेसारखं ‘पॉश’ रहाणं कसं ते जमतच नव्हतं त्यांना. एखादी झुळझुळीत साडी घ्यावी ही त्यांना गरजच वाटेनाशी होती. घरकोंबड्या बनून त्या फक्त टी.व्ही. एके टी.व्ही. पहात रहायच्या. त्यावरही सुनेची टीका होतीच.. ‘काय मेलं अख्खा दिवस टी.व्ही. पहायचा? असतं काय त्यात?’ शालूताई कर्तबगार होत्या एके काळी. पण आता? अगदीच अडगळ!....

अशा आपल्या अवतीभवती अनेक ‘शालूताई’ असतात. काळा बरोबर चालणं त्यांना जमतच नाही. नवीन घरमॅनेजमेंट त्यांना जमत नाही. जुनी नोकरी सांभाळणाऱ्या कचेरीतल्या अनेक ‘शालूताई’ नवीन मॅनेजमेंटमध्ये बाद होत जातात. कचेरीतही त्यांना कामं करवून घेता येत नाहीत. काळाचा महिमा आहे हा! या संदर्भात एक छाऽऽन समांतर (विनोदी) गोष्ट वाचनात आली. मित्रहो, तुम्हालाही ती माहिती असेलही कदाचित. पण या मुंगी शालूताईची गोष्ट इथे परत सांगतेच.

तर; ऐका मुंगीची कथा. एक मुंगी होती. रोज सकाळी लवकर उठून ती काम सुरू करायची. सतत काम करणं अन् आनंदी राहणं हा तिचा स्वभाव. सिंह त्या मुंगीचा ‘बॉस’ होता. एकदा सिंहाला वाटलं की ‘कामावर कुणाचं लक्ष नसतानाही मुंगी इतकी काम करते तर ‘सुपरवायझर’ नेमला तर ती किती काम करील?’ झालं. सिंहानं मुंगीच्या कामावर लक्ष ठेवण्यासाठी एका झुरळाची नेमणूक केली.

झुरळानं प्रथम काय केलं असेल तर घड्याळ लावून, मुंगीची हजेरी घेणं सुरू केलं. आपले अहवाल टाईप करण्यासाठी त्यानं एक ‘पी.ए.’ नेमला. झुरळाचे अहवाल पाहून सिंह खूष झाला. त्यानंतर त्यानं ‘उत्पादनातील वृद्धी आणि कल’ यांचं विश्लेषण करणारे तक्ते करायला सांगितले. ते त्याला ‘बोर्ड मीटिंग’मध्ये सादर करायचे होते. मग काय? या कामासाठी झुरळानं कॉम्प्युटर, लेसर प्रिंटर विकत घेतला. हे ‘आय.टी. डिपार्टमेंट’ सांभाळण्यासाठी एका माशीची नियुक्ती केली.

कधीकाळी आनंदानं जगणारी आणि सहप्रेरणेनं भरपूर काम करणारी मुंगी कागदांच्या अन् बैठकांच्या माऱ्यानं वैतागून गेली. त्यात तिचा वेळ जाऊ लागला. तिच्या कामावर परिणाम होऊ लागला. मुंगी ज्या विभागात काम करत होती त्या विभागात एक ‘इन्चार्ज’ नेमण्याची गरज आहे असं झुरळानं सिंहाला सांगितलं. त्यानं तिथं गांधीलमाशीची ‘इन्चार्ज’ म्हणून नेमणूक केली. लगेच गांधील माशीनं नवीन कॉम्प्युटर घेतला अन आर्थिक व्यवस्थापकाचे अहवाल तयार करण्यासाठी एक ‘पी.ए.’नेमला. साहजिकच मुंगीच काय; तिच्या बरोबरचे प्रामाणिकपणे काम करणारे निराश झाले. कोणी हसेना. त्या जागी अवकळा पसरली. त्यामुळे मुंगीच्या विभागातील वातावरणाचा नव्यानं अभ्यास करण्याची गरज आहे असं गांधील माशीनं सिंहाच्या मनावर बिंबवलं. कारण मुंगी अबोलपणं काम करायची; तर गांधीमाशीला अखंड गुणगुणता यायचं ना! गांधील माशीच्या सांगण्याप्रमाणे सिंहानं तशी व्यवस्था केली. पाहणी झाली. मुंगीच्या विभागातील उत्पादन पूर्वीच्या तुलनेत खूप कमी झालं आहे असा निष्कर्ष त्या पाहणीतून निघाला.

या साऱ्या प्रकाराचा आढावा घेऊन उपाययोजना सुचविण्यासाठी सिंहानं घुबडाला कन्सल्टन्ट म्हणून नेमलं. घुबडाने भला मोठा पगार घेऊन तीन महिने अभ्यास केला. भला मोठा अहवाल दिला. विभागात कर्मचाऱ्यांची संख्या नको तितकी वाढली आहे असा त्याचा निष्कर्ष होता. या साऱ्या घोटाळ्यासाठी सिंहानं कोणाला दोषी धरलं असेल? सांगा बरं! अर्थातच (शालूताईंना! नव्हे; नव्हे;) मुंगीला! ‘कामाच्या प्रेरणेचा अभाव आणि नकारात्मक मनोवृत्ती’ असा शेरा मारून त्यानं ‘सिंह पराक्रम’ करून मुंगीला घरची वाट दाखवली!

मंडळी, या कथेचा उदय झाला पोर्तुगालमध्ये. ही कथा माध्यमांद्वारे जगभर फिरतेय. श्रमप्रतिष्ठा मातीमोल मानून आधुनिकीकरणाच्या नावाखाली माणसाच्या सहजसुंदर जीवनशैलीची कबर खोदण्याचं एक मोठं जनित्र सध्या ‘मॅनेजमेंट’च्या चुकीच्या कल्पनेला खत घालत काम करीत आहे. शालूताई जुन्या काळातली म्हणा. पण अशा प्रामाणिक मुंग्या आजही अनेक आहेत; त्यांना ‘व्हॉलेंटरी रिटायरमेंट’ घ्यावी लागतेय. न घेतली तर मानहानी. घेतली तर आजवरच्या मानानं जगायला लावलेल्या कार्यशैलीवर भली मोठी फुल्ली! शालूताईंसारख्या आयुष्यभर स्वबळावर, भक्कम काम केलेल्या अनेकजणांसमोर भला मोठा प्रश्न आहे - ‘सांगा, कसं जगायचं?’

*

विस्तारित संपादकीय

(पान १ कॉलम ४ वरून)

his name very meaningful, but a tad unique! I would say more meaningful and well carved for him, as he indeed has been the apple of his parents' eyes ever since his birth till date and that pleasure he still enjoys, sometimes over-ruled by our little bundles of Joy – our two sons.

He spent his childhood at Opera House amongst a massive joint Nayak family, though those were his very early childhood days, he still has vivid memories of Opera House and the large family he lived with. Soon they moved to Santa Cruz where slowly and steadily life engrossed him amongst family, a huge friend circle, cricket, movies and studies! While his father has the maximum influence on him and his mother ensured he gets a grounded upbringing, another person who played a very affectionate and important role in his life is his Chanda maushi (aunt) whom he fondly calls ‘mimi’. She has looked after him as much as his own mother and she is equally fond of him perhaps the only person who makes it a point to address him with another name "Suyog". That's his second name fondly given by her, the Maushi's prerogative as we all know!

Coming from a well settled middle-class Pathare Prabhu family, he has enjoyed a very happy childhood quite alike most of us, of course I keep bragging to him that I come from a bigger and crazier joint family, therefore I had a crazier and much more fun-filled childhood than him, but I am sure that remains to be just a light argument.

Gunjar is a very competitive person. He always likes to be better than the best. So that makes him compete with me all the time! Jokes apart, but his competitive streak helped him effortlessly cross the school / college days as well as his post-graduation. This competitive flash of his is very evident when he drives on the roads! He will not let any other car over-take him, nor will he keep gazing at another car's tail light. All cars have to be behind his, and he will merrily gaze at them from his rear view mirror as he zooms on the roads. He is notorious for his flair with the traffic watchdogs much against my amusement. This is definitely one of his child-like characteristics that will never allow him to grow old. Talking about cars! Like all boys, Gunjar loves his cars, we all who know him, can trace back to his teens and re-live all memories till date with the help of the car arranging his life chronologically with the car he drove at that point in time. The first car that he ever made me sit in was a green colour Maruti 800 and our friends still remember the Green maruti 800 as 5120 (the only part of the number plate I recall). His car, the trending music of those days playing loudly in the car, usually the car is on its way to a movie hall and we friends inside the car, is how we used to and we still do spend a lot of our weekends. The friends have remained but surely multiplied over the years with spouses followed by our kids! His cousins say he used to love playing video games with them, and even today he fights with our sons to grab a chance at a video game! Cars, video games, movies, music, such are his favourite things to do, which make me wonder, has he really turned 40?

Well his favourite things to do are actually his entertainment in his free time, what he mostly stays busy in is what he loves to do the most. That's his job! He is irritatingly persistent, dreams big, very friendly, good at number crunching, can talk a lot and as I mentioned earlier extremely competitive. That makes him perfect for his role. He joined the Zee Entertainment Network back in 2001 as a Sales Executive. Started doing what he is best at that's selling! Ever since then Zee has infected his entire system. He breaths, eats, drinks, & sleeps Zee, to the

(पान ४ कॉलम ३ वर)

लेख क्रमांक ४

# अनुवाद-संवाद

-सौ. कल्पना सुभाष कोठारे

# पूर्ण किंमत मिळाली

-कल्पना सुभाष कोठारे

एका तरुणाचा पदवीदान समारंभ जवळ आला होता. अनेक महिने तो एका शोकेसमधील स्पोर्टस् कारकडे डोळे लावून बसला होता. त्याच्या वडिलांना ती कार विकत घेऊन देणे, सहज शक्य होते 'मला दुसरे काही नको. परीक्षा उत्तीर्ण झाल्यावर बक्षीस म्हणून ती कारच द्या' असे त्याने वडिलांना सांगूनही ठेवले होते. अखेर तो दिवस उजाडला. त्याचे वडील म्हणाले की त्यांना असा हुशार मुलगा मिळाल्याचा अभिमान वाटतो. त्याच्यावर आपले खूप प्रेम असल्याचे सांगून वडिलांनी त्याच्या हातात सुंदर कागदात बांधलेली भेटवस्तू ठेवली.

उत्सुक परंतु जरा निराश अंत:करणाने त्या मुलाने ती सुंदर कागदात बांधलेली वस्तु उघडली. ते एक चमड्याचे वेष्टन असलेले बायबलचे पुस्तक होते. त्या मुलास वडिलांचा खूप राग आला. मोठ्या आवाजात तो वडिलांवर खेकसला, 'तुमच्याजवळील अमाप संपत्तीतून, तुम्ही मला फक्त हे बायबल दिलेत?' रागारागाने ते पुस्तक तिथेच फेकून तो घराबाहेर पडला. कायमचाच!

अनेक वर्षे लोटली. आता तो तरुण मोठा उद्योगपती बनला होता. अनेक गाड्यांचा तो मालक होता. त्याचे स्वत:चे कुटुंब होते. अचानक एकदा त्याला वडिलांची आठवण झाली. त्या परीक्षेच्या निकालाच्या दिवसानंतर त्यांची भेटच झाली नव्हती. आता ते वृद्ध झाले असतील, या विचाराने तो त्यांना भेटण्यास निघण्याची तयारी करू लागला. परंतु तो तेथे पोचण्यापूर्वीच, बातमी आली की त्याचे वडील निवर्तले आहेत. व त्यांनी आपली सर्व मालमत्ता मुलाच्या म्हणजे त्याच्याच नावावर केली आहे.

दु:ख आणि पश्चात्ताप यांनी भरलेले हृदय घेऊन तो वडिलांच्या घरी पोचला. वडिलांचे कागदपत्र हाताळीत असताना, त्याच्या हाती ते बायबलचे पुस्तक पडले. ते तसेच नवेकोरे होते. अश्रुभरल्या डोळ्यांनी त्याने बायबलची पाने चाळली. आणि त्याच्या हाती एक पाकीट पडले. पाकिटात एक पावती व एक चावी होती. पावतीवर स्पोर्टस् कार डीलरचा पत्ता होता व त्याने पदवी ग्रहण केलेल्या दिवसाची तारीख होती. जाता येता तो जी स्पोर्टस् कार न्याहाळत असे, तिचीच ती चावी होती. पावतीवर 'पूर्ण किंमत मिळाली' अशी अक्षरे होती.

आपणही कित्येकदा देवाने दिलेल्या भेटवस्तुंचे वेष्टन न उघडताच, दैवाला दोष देत बसतो, नाही का?

(मूळ इंग्रजी कथा 'पेड इन फुल्ल' हितवाद, नागपूर वृत्तपत्रातून.)

✳

## 'पाठारे प्रभु सोशल समाज' आणि हौशी कला मंदिर'

रविवार दि. २९ मे २०१६ रोजी सकाळी ८ वाजल्यापासून 'मिलन सबवे' जवळील 'विलींग्डन क्रिसेंट' मैदानावर, सांताक्रूज (प.) वरील दोन्ही संस्थांमार्फत एकत्रित टेनिस बॉल 'बॉक्स क्रिकेट'चे सामने (ओव्हरआर्म) आयोजित केले आहेत. महिलांसह इच्छूक व्यक्तींनी अधिक चौकशीसाठी लवकरात लवकर पुढील व्यक्तींशी संपर्क साधावा.

सौ. नीता सेंजित - ९८२०१६६६२८
श्री. जयंत कीर्तिकर - ९८६७९५८५३५
श्री. अतुल जयकर - ९९२०१४२४०२
श्री. रोहिल जयकर - ९८१९०७००८९

✳

## Congratulation

✶ "Dr Priya Sudhir Dhurandhar has been promoted as Director-Transplant Immunology & Immunogenetic (HLA) Dept. located at Global Hosp for all centers of Metropolis Healthcare in India, Sri Lanka, Dubai, South Africa, Kenya, Mauritius and Bangladesh, US and UK."

✳

कविता

## दरिद्री दारूची बाटली

दु:ख; दु:ख दु:ख उठलं।
सारं नशीब माझं फुटलं।
दारूच्या बाटलीनं।
घरदार माझं मिटलं।।धृ।।
होतो सुखी किती मी।
बेकार अता ना मी।।
दारूने पदरी आली।
अवघी ती बदनामी।।
दारूस मन फसलं।
दारिद्र्य घरी घुसलं।।
दारूच्या बाटलीनं
घरदार माझं मिटलं।।१।।
पोरांस रोज छळलं।
पत्नीस दु:खी केलं।।
त्रासून बाटलीला।।
घरदार तिनं सोडलं।।
दारूत सारं गेलं।
काही नाही आता उरलं।।
दारूच्या बाटलीनं
घरदार माझं मिटलं।।२।।

-विठोबा गजानन नायक

बालविभाग

## Friendship

A relationship which cannot be broken,
A voice that can be heard from far.
Everytime has the same token,
Feels as hard as a road made from tar.
Everytime there are down falls,
We also together enjoy our screams.
But taking a selfie with beautiful waterfalls,
We flow like never ending streams.
We all maybe busy,
Can't even call up each other.
But when we come together it feels very cosy,
After taking a cookie bite together.
This is what friendship means,
Full of enthusiasm and always very keen.

✳

## I travelled and travelled and travelled

I travelled and travelled and travelled,
Through oceans and seas.
I travelled and travelled and travelled,
Through highways and roads.
I travelled for something,
Not big for others but yes for me.
I travelled a very long way but for what?
I travelled for the betterment of others and,
Smiles on their face…

-Aarti Kothare
Std: VII

## At The Time of My Retirement

Friendship is a sheltering tree
I had many friends to talk with me
When I have completed my journey
There is nobody to accompany
But can I forget them?
No - Never
As they gave me love for ever

-Sheela Mukund Kothare

## हसरी रेखा

-प्रदीप कोठारे



# BEFORE TYING THE KNOT

**-Mrs. Ketaki Rajan Jayakar**

Being so alarmed with the increasing rate of Divorce, and more with the frivolous reasons for divorce, I feel that we elders in the Community should start a Pre Marital Counselling Programme.

Once the boy and girl decide to meet each other and the parents approach each other, considering the family background, the educational qualifications of the parties, and the economic status of the parties, a questionnaire for the boy and the girl should be prepared, which they have to consider before they decide to marry each other. Some independent person can be the Ice Breaker and conduct the programme . Needless to say that the whole programme should be absolutely confidential. With the changing times, and changing mindsets it is very necessary for both the parties to put forward their requirements regarding the partner as well as what are their inputs in the marriage.

The parents may feel it unnecessary to discuss so many points before tying the knot, since they themselves had entered marriage on the advice of their parents and have made a success of their marriage. However in today's day and age, women are highly qualified and are occupying important posts at their work place and are even required to travel out of station or even abroad. Women are not just earning some pocket money, but are earning huge amounts, They are no more twenty year olds, just finished their graduation and ready for marriage to the person suggested by some elders in their family. Today's woman is a thinking woman and wants to take her own decisions.

Today, we are so broad minded that in an arranged marriage the boy and the girl can meet a number of times and openly dicuss their needs, their plans for future their living conditions, joint family/nuclear family preference, financial commitments if any, financial responsibilities, children etc. Once the boy and girl have discussed their own viewpoint then they can involve the parents to discuss further the modalities for fixing the marriage.

Formerly the girl was married off and she did not have to bother about her parents who were well taken care off in the joint family. Today a girl may want to take care of her own parents/widowed/single parent who is living alone. She may want to financially support her aged parents. It is always prudent to discuss these points before even agreeing to marry. It saves a lot of heart ache later in marriage.

Now the age of marriage has also increased. Youngsters first concentrate on their career and then think of marriage. Girls do not want to start a family immediately after mariage. Some girls may prefer even not to have children. These priorities should be put forward before saying yes to the alliance.

Some girls do not wish to live in a joint family, some even do not want to change their maiden names because it is a great nuisance to change all your official documents. Some girls have financial liabilities of repaying loans taken for their education. There are number of points which may be important to the girl which may not interest the boy. Common interest, hobbies, how much time would they spend together, all these things have to be considered before tying the knot.

The Catholic Church does not perform a marriage without the certificate from the Pre Marital Counsellor. We can definitely take a few advantageous tips from the Church to make our marriages more successful.

The same thing applies to love marriages. Sometimes after the honeymoon period is over the reality dawns upon them and the sweetest lover becomes the bitterest enemy. So many couples who have courted each other for a couple of years before their marriage, do not even celebrate their first wedding anniversary! One couple who were both MBAs and at the instance of the boy the girl went to London and did her Post graduation, returned to India, married him and within one year went to the Family Court because he expected her to be at home at 1p.m. to make hot rotis for him when he would come home for lunch! His mother had been making hot rotis for his father when he came home for lunch.

In another case, in the first year of their marriage, a young foreign educated husband wanted a Divorce from his very talented and successful wife because she did not do the Nagpanchmi pooja! This is unheard of, yet true! Both of them belonged to different communities and they had never discussed the religious practices which the girl was expected to follow after marriage. If expectations on the religious side of the family had been told to the girl earlier, it could have saved all the unpleasantness.

Another young wife wanted a divorce because the mother-in-law was extremely shabby, dirty and unhygienic. The husband was the only son and would never dream of abandoning his parents. He was so used to his mother's unhygienic ways that he did not find anything wrong in them. Had the girl seen the house prior to their engagement she would have thought twice before tying the knot.

Previously people married within the community so that the living conditions, the financial conditions were known to everybody in the community, so it was not a big leap into the unknown for the girl. Today it is a different ball game, so it is always better to test the waters into which you are going to jump.

Today, there are a lot of intercaste /inter religious marriages. The boy and the girl have known each other in the office or meet at Shadi.com or some other such website or otherwise, but are not aware of the life style they are used to at home. It is always prudent to get to know their respective preferences, their priorities, lifestyle, their home atmospheres, their religious practices, their social life etc. before tying the knot.

I have seen a case where the girl refused to do any household work and would pile up the dirty vessels and plates in the kitchen sink and the used plates would fill up the entire kitchen because she would not clean them for a whole week. She was an MBA and was working from home on her laptop. The husband produced in Court the photos of the kitchen with the soiled plates and the ant hills which had grown over the days. They had met on some mariage website!.

I have handled a case where the couple had been working in the same office and knew each other for two years before marriage. After marriage and one daughter later the girl realised that the boy was so passionate about his photography hobby that he would disappear every weekend into some forest to capture thrilling photos of wild animals. He was a married bachelor and had no sense of responsibility and come rain, come hail he had to go every weekend into the forest and left her alone to handle the cantancarous in-laws and a young infant.!

I hope the readers take a very serious view of this rapidly growing cancer which will eat into the fabric of our society and do something constructive about this problem. I am really concerned for the present genration who is so well equiped to tackle professional emergencies, but get totally stumped when striking a balance in their personal life.

❀

---

(पान २ कॉलम ४ वरून)

extent that I feared he will name our first born ZEE… Well he has come a long way professionally, he does not like to boast about his accomplishments but he has spent 16 long years in a tough organisation like ZEE and is today a Cluster Head across various channels and going steady strong!

I am not mentioning this because I want to brag about him, but because a lot is left behind in this race to be the best. I think the time has come that he starts picking up all the things he has left behind to reach where he is. Of course I am aware that to stay where one has reached is in itself a tough rather persevering journey and he surely has bigger ambitions going forward. But life is constantly ticking, and time is not waiting.

At 40 if we realize that we need to pick all that is left behind in the journey, be it friends, hobbies, travel the world (withme), taking care of our own health, picking up a sport, some art form, spending time with family then by the time we reach our half century, we may feel that our 50 years have been more fulfilling. And then 50 years old, are still young, and another 10 years to even turn a senior citizen. Suddenly life seems to be so well planned exactly how our insurance agent explains it to be while selling a policy!

Off late, I have been writing less in Prabhu Tarun. While we have some new pens and minds giving us some wonderful articles, Gunjar always felt that I should contribute to the magazine in some form or the other. Prabhu Tarun is very close to his heart and therefore to me too. While it remains to be a tough journey to live up to all the requirements of the magazine, my article is more of a dedication. I dedicate this article to this wonderful bond that Gunjar shares with this magazine. This magazine probably is a part of his cosmic connection with his dad - some form in which he feels connected to him. It is difficult to cover the entire 40 years in a 2.5 page article, so many aspects of our lives I may not have touched upon, as that would open a Pandora's Box of memories! Gunjar and I have been friends for around 20 years now of which we are married for 11 years! That makes us best friends first! We both being so closely associated with this magazine, I have written this article like I would about a close friend! He may want to kill me for giving so much space of Prabhu Tarun to talk about him, though it is not just about him, but it is about a life I feel is beginning at 40!

❀

आलटून पालटून-

# जमाखर्च

-सौ. जयमती जयपाल तळपदे

'निरू.' रामने हाक मारली. आवाजाच्या दिशेने तिने मान वळवली; पण तिच्या नजरेत ओळख नव्हती.. काही दिवसांपूर्वी ताप येऊन गेल्यानंतर तिच्या स्मृतीतून कदाचित् ओळखच पुसली गेली होती. रामने नर्सच्या हातातून ज्यूस घेऊन निरूला पाजला. दुपारचे जेवणसुद्धा तो तिच्याजवळ बसून घ्यायचा. तिला भरवायचा. निदान त्यानिमित्ताने तरी तिने त्याला पूर्णपणे विसरू नये किंवा ती विसरणार नाही असे त्याला वाटायचे. एकटाच बसला की त्याला आपल्या आयुष्यातले सोनेरी क्षण आठवायचे. डोळ्यांसमोरून चित्रपट सरकायचा. तो, क्षमा आणि निरुपमा एकाच बँकेत; पण वेगवेगळ्या शाखांमध्ये ऑफिसर म्हणून काम करायचे. क्षमा म्हणजे त्याची बायको. त्यांचा प्रेमविवाह होता.

''बेबी, हे बघ, हा शाळेच्या फीचा चेक बँकेत निरुपमामावशीकडे दे. ती सर्व बरोबर करून पावती देईल. ती घेऊन ये.'' क्षमाने आपल्या मुलीला सांगितले. ही बँकेची छोटी छोटी कामे ती बेबी किंवा राजवर म्हणजे तिच्या मुलांवर सोपवून मोकळी व्हायची. निरुपमाच्या शाखेत तिचे खाते असल्यामुळे व निरू कामाच्या बाबतीत अत्यंत हुशार व वक्तशीर असल्यामुळे तिला किंवा रामला बँकेत जावे लागत नसे; पण मुले मात्र निरुमावशीच्या गोड स्वभावामुळे बँकेत जायला उत्सुक असत. बँकेत तिला लोक फार मानत. एक दिवस, अचानक निरूच्या लग्नाची आमंत्रण पत्रिका घरी आली. ती जॉन मेंडोसा नावाच्या बँकेतीलच एका अधिकाऱ्याशी लग्न करणार होती. का कुणास ठाऊक; क्षमा तिला मुद्दाम भेटायला बँकेत गेली. तिने मुलाची सर्व चौकशी केली. पण निरूला त्या मुलाबद्दल पूर्ण खात्री होती. तो तिला तिचा धर्मही बदलायला सांगत नव्हता आणि ती आपल्या मनाप्रमाणे सर्व करू शकेल असेही म्हणत होता. तिचा विश्वास बघून क्षमा गप्प बसली. पण जेव्हा निरूच्या लग्नात तिने त्याला पाहिले तेव्हा का कोण जाणे; राम, क्षमा आणि अगदी मुलांनासुद्धा हा अंकल आवडलाच नाही. पण निरू मात्र खूप खूष दिसत होती. बँकेच्या नियमाप्रमाणे, नवराबायको एकाच शाखेत काम करू शकत नसल्यामुळे जॉनची दुसऱ्या शाखेत बदली झाली. काही दिवसांनी निरूसुद्धा बदली होऊन दुसरीकडे गेली. नजरेआड झाल्याने ती राम, क्षमा आणि मुलांच्याही मनात थोडी मागे पडली.

अशीच चारपाच वर्षे गेली. बेबी आणि राज मोठे होऊन कॉलेजला जाऊ लागले. आणि अचानक निरू रामच्या डिपार्टमेंटला बदली होऊन आली. तिचा अगदीच अवतार झाला होता. चेहऱ्याचा गोडवा कुठंच्या कुठेच गेला होता. डोळे भकास दिसत होते. हळुहळू रामला तिची हकीकत तिने सांगितली. सुरुवातीला तिचे सर्व छान चालले होते. वर्षानंतर तिला एक मुलगासुद्धा झाला. त्याचे नाव समीर. तेही तिच्या आवडीचेच. नंतर जॉनला प्रमोशन मिळाले व त्याची बदली गोव्याला झाली. इथूनच निरूच्या दुर्दैवाला सुरुवात झाली. जॉन एकटाच पुढे गेला. निरूला बदली मिळेपर्यंत गोव्यात जॉन पुरता दारूच्या आहारी गेला होता. मग तिचा विरोधही त्याला सहन होईना. तिने तऱ्हेतऱ्हेने त्याला समजविण्याचा प्रयत्न केला. समीरची शपथही घातली. पण सारे व्यर्थ. आणि मग भांडणे मारहाणीवर गेली. त्याचा परिणाम समीरवर व्हायला लागलाच; पण त्याच्या ऑफिसातील दुष्कीर्तीवरही होऊ लागला. निरूला आपल्या जीवाची भीती वाटू लागली आणि मग तिने सारी परिस्थिती वरिष्ठांना सांगून आपली मुंबईला बदली करून घेतली. आता ती घटस्फोटासाठी प्रयत्न करीत होती. क्षमाला आणि मुलांना हे सारे कळल्यावर त्यांनी रामला तिची मदत करण्यासाठी भरीस घातले.

राम तिला सर्वतोपरी मदत करीत होता. वकीलांच्या गाठीभेटी, कागदपत्रे तयार करणे यासारख्या अनेक गोष्टीत तिला त्याची मदत होत होती. कधीकधी गरज असेल तेव्हा समीरही त्याच्या घरी मुलांबरोबर खेळायला जायचा. त्या सगळ्यांची चांगलीच गट्टी जमली होती. निरूला एकदाचा घटस्फोट मिळाला. या भानगडीतून जरा कुठे तिची सुटका होते न होते तोच घरातच खेळता खेळता समीर पडला. त्याचे डोके पलंगाच्या सळीवर आपटले आणि पाय पलंगाच्या पायामध्ये अटकले. त्याच्या डोक्याला आणि पायाला गंभीर जखमा झाल्या. निरूने पहिला फोन रामलाच केला. समीरला हॉस्पिटलमध्ये ॲडमीट करण्याचे कामही त्यानेच केले. गरज असलेले सारे फॉर्म्स त्यानेच भरले. निरूला तर कसली शुद्धच राहिली नव्हती. ती नुसती ओक्साबोक्सी रडतच होती. समीरची दोन ऑपरेशन्स करायला लागली. तो रामचा हातच सोडत नव्हता. रामनेही दिवसरात्र काही पाहिले नाही. समीर हळुहळू बरा होत होता, पण आधारासाठी रामच्या खांद्यावर विसावलेले निरूचे डोके त्याच्या छातीवर कधी विसावले ते दोघांनाही कळले नाही. आणि कळेपर्यंत ते एकमेकात इतके गुंतले होते की तिच्यासाठी परतीची वाट कठीण होती. कारण की ती आधारहीन होती. पण तिला रामचा संसार मोडायचा नव्हता. तिला फक्त त्याचा थोडा आधार हवा होता कारण आता समीरही त्यांच्यात गुंतला होता. त्यालाही रामचा भक्कम आधार हवा होता. जॉनच्या त्या किळसवाण्या रूपानंतर त्याला रामचे स्वरूप लोभस वाटत होते, हवेहवेसे वाटत होते आणि आदर्शही वाटत होते.

क्षमाचा रामवर एवढा विश्वास होता की, या सर्व घडामोडी तिच्या लक्षातच आल्या नाहीत. तसेच रामचेही तिच्यावरचे प्रेम तसूभरही कमी झाले नव्हते. त्याला त्याची अर्धांगी म्हणून ती हवीच होती. तो स्वतःच गोंधळून गेला होता. काय बरं नाव होतं त्याच्या आणि निरूच्या संबंधाचे? ही केवळ सहानुभूती होती का? की दोघींवरही प्रेम होते? एकाच डिपार्टमेंटमध्ये असल्यामुळे तो निरूला टाळूही शकत नव्हता. दोघांनाही अपराधी वाटत होते पण सारखे असे काहीतरी घडत होते की निरूला सारखी रामची मदत लागत होती. समीरही त्याला भेटायचा हट्ट करत होता. रामची मानसिक ओढाताण होत होती. क्षमाला वाटत होते की, त्याला ऑफिसातील कामाचा ताण आहे. पण त्याची ही घालमेल पहिली लक्षात आली ती घरातल्या तरुणाईच्या म्हणजे मानसशास्त्राचा अभ्यास करणाऱ्या बेबीच्या.

''बाबा, तुझे काय चाललेय?तुला आईपासून घटस्फोट हवाय का?''

रामने चमकून तिच्याकडे पाहिले.

''बेबी, काय बोलते आहेस तू? मी क्षमाशिवाय राहू शकेन?'' त्याने ओरडून विचारले. त्याच्या डोळ्यात पाणी तरारले होते. ''बेबी, माझे क्षमावर प्रेम आहे गं!''

''पण निरूमावशीला तुझा आधार हवा आहे असेच ना? म्हणजे तू तिलाही सोडू शकत नाही. बरोबर?''

''तसेच काहीसं. मलाच कळत नाही काय बरोबर आणि काय चूक ते. मी काय करू?''

राम बेबीशी मनमोकळेपणे बोलत होता.

''निदान सासरमाहेरचा काहीही आधार नाही. कुठे जाईल ती? मी तिला आणि समीरला असे वाऱ्यावर कसे सोडू?''

''बाबा, पण हे आईला कळले तर ती मोडून पडेल. तिला हे सगळे सहन होणार नाही. मग तू काय करशील? तुला काहीतरी निर्णय घ्यायलाच हवा.''

''मला दोघीही हव्या आहेत गं. मी दोघींनाही आनंदात ठेवीन. फक्त क्षमाने समजून घेतले तर. निरूची माझ्याकडून फार काही अपेक्षा नाही गं.''

पण कोंबडं झाकलं तरी सकाळ व्हायची रहात नाही, तसंच हे सगळं प्रकरण क्षमाच्या लक्षात आलंच. ती खूप रडली. त्याला खूप बोलली. त्याने परोपरीने तिला समजावण्याचा प्रयत्न केला. पण म्हणाली, ''माझ्यात काय कमी होतं म्हणून तू तिच्याकडे गेलास? माझा तू विश्वासघात केलास. तिला आधार हवा होता, तो तिने शोधला; पण तो आधार तू का दिलास? तुला दुसरे कोणी नाही तिच्यासाठी शोधता आले? अरे, मला सांगायचे ना? मी कुणीतरी चांगला माणूस तिच्यासाठी शोधला असता. राम, तू माझा एकवचनी, एकपत्नी 'राम' होतास. पण तू माझ्याकडे पाठ फिरविलीस. आपल्या सुखी संसारात काय कमी होते रे? स्वतः तर फिरलासच, वर माझ्या मुलानांही फितवलंस! ती मला सांगतात, 'जाऊ दे ना आई. तुला तर बाबा काही कमी करत नाही ना? तुला पूर्वीसारखेच विचारतो ना?' काय जादूटोणा केलास रे त्यांच्यावर? का त्यांना माझ्यापासून दूर नेलंस? आज तुला माझं दुःख कळणार नाही. पण प्रत्येकाला आपण केलेल्या चुकीचे आणि पापाचे परिणाम आज ना उद्या इथेच भोगायला लागतात. तेव्हा तू माझी आठवण काढशील.''

''क्षमा, काय बोलतेस तू? मी तुझ्याकडे पाठ फिरवली नाही गं. मलाच तुझ्या आधाराची गरज आहे. मला थोडं समजून घेना प्लीज. अशी टोकाची भूमिका नको घेऊ गं.''

पण त्या दिवसापासून क्षमाने त्याच्याशी बोलणे टाकले. ती पुढे पुढे प्रमोशन्स घेत गेली. तिच्या निरनिराळ्या ठिकाणी बदल्या झाल्या. आणि एक दिवस हार्टॲटॅकने ती त्याला सोडून गेली.

क्षमा गेली आणि सहा महिन्यातच निरूचा अल्झमायरचा रोग लक्षात आला. बघता बघता आजार बळावत गेला आणि निरू या आजच्या परिस्थितीत आली. कुणालाही न ओळखणारी. अगदी त्यालासुद्धा!

त्याच्या आयुष्यात जन्माची साथीदार बनून आलेली क्षमा त्याला अव्हेरून गेली होती आणि त्याच्यावर आयुष्य ओवाळून टाकणारी निरू आता त्याला ओळखतसुद्धा नव्हती. क्षमावर झालेल्या अन्यायाची शिक्षा त्याला मिळाली होती. तिच्याबरोबर असलेला जमाखर्च आता तंतोतंत जुळला होता.

*

## प्रभु तरुण आश्रयदाते

१) सौ. विमल व श्री. माधव नायक,
२) सौ. नलिनी व श्री. रविंद्र रामराव मानकर,
३) सौ. अनामिका बी. ए. एल.एल.बी.
४) कै. नटवर्य नारायण रामराव झावबा
५) कै. सॉ. मोतिराम विनायक जयकर
६) आद्य संपादक कै. विष्णु कृष्ण कोठारे
७) कै. रावसाहेब चंद्रकांत बालमुकुंद वेलकर
८) कै. सौ. सुशीला यशवंतराव कीर्तीकर
कै. सौ. सुशीला व श्री. मोरेश्वर वि. प्रधान
९) सौ. मीरा व श्री. रविंद्र नानूजी दळवी
१०) कै. सौ. शलाका (अरुणप्रभा) शैलकुमार श्रीकृष्णनाथ दळवी
११) कै. श्रीमती चंपुबाई आणि कै. आनंदराव सुंदरजी धराधर
१२) कै. सौ. रोहिणी (रत्नप्रभा) श्रीकर राणे
१३) सौ. निलीमा व श्री. सूजन केशवराव राणे
१४) कै.श्रीमती रोझाबाई आणि कै. बाळाराम केरोबा नायक
१५) कै. शरद विनायक कीर्तिकर यांच्या स्मरणार्थ अनामिक
१६) कै. सॉ. दिलीप रघुनंदन कोठारे
१७) कै. श्रीमती कमलजा आनंदराव अजिंक्य
१८) कै. दिवाळीबाई व कै. डॉ. वामनराव आनंदराव विजयकर
१९) कै. विष्णुराज बाळाराम नायक
२०) ॲड. सदाशिव आनंदराव धुरंधर
२१) कु. कस्तूर मोठाबाई जयकर
२२) कै. कमलिनी रमाकांत प्रधान
२३) कै. नटवर्य शरद श्रीकृष्णनाथ गणपतराव दळवी
२४) आद्य मराठी लघुलिपीकार कै. भुजंगराव रामचंद्र मानकर
२५) कै. वामन मोरेश्वर प्रभाकर
२६) कै. चंद्रकांत नारायण विजयकर,
कै. कुंजविहारी वाय. जी. तळपदे,
कै. प्रविण चंद्रकांत नारायण, विजयकर,
कै. वैभव कुंजविहारी वाय. जी. तळपदे
यांच्या स्मरणार्थ एक हितचिंतक
२७) कै. डॉ. विद्याधर चंद्रकांत नारायण विजयकर यांच्या स्मरणार्थ हितचिंतक
२८) कै. पूर्णचंद्र केशरीनाथ राव व
कै. सौ. शीला पूर्णचंद्र राव यांच्या स्मरणार्थ
२९) डॉ. राम गोविंदराव नवलकर
३०) सौ. शुभांगी राम नवलकर
३१) सौ. रीटा आणि श्री. मंदार माधवराव नायक
३२) कै. सौ. विजया व श्री. प्रकाश माधव नायक या त्यांच्या आईवडिलांच्या स्मृत्यर्थ उन्मेष प्रकाश नायक
३३) सौ. वृंदा आणि श्री. शाम विनायक जयकर
३४) कै. श्रीमती जयश्री आणि कै. श्री. जयवंत विश्वनाथ कीर्तिकर स्मृत्यर्थ श्री. उमेशचंद्र जयवंत कीर्तिकर
३५) कै. श्रीमती प्रतिमा आणि कै. श्री. धाकलेश्वर बाळाजी जयकर स्मृत्यर्थ सौ. सुप्रिया उमेश कीर्तिकर

## प्रभुतरुणाची डायरी

### बाळा जो जो रे

९-३-१६ सौ. भावना आणि श्री. मोनीत (मिंकीत) रसिक विजयकर, पुत्र, कांदिवली

### नांदा सौख्यभरे

२५-३-१६ कु. प्रियांका विजय प्रभाकर, श्री. नीतेश प्रफुल्ल बांदेकर (आं. ज्ञा.)
०२-४-१६ कु. नम्रता संजय पद्माकर कीर्तिकर, श्री. भूषण विजय कारखानीस (आं. ज्ञा.)

### विवाह सुवर्ण महोत्सव

३-५-१६ श्री. नंदकुमार कृष्णराव विजयकर, कु. सुहास सुरेंद्र जयकर.

### मरण

| | | | |
|---|---|---|---|
| १०-१-१६ | श्री विलास यशवंत कीर्तिकर, | वय ७९, | ठाणे |
| २०-१-१६ | श्री. राम प्रधान, | वय ९०, | ठाणे |
| ३१-१-१६ | श्री. शरद मल्हार व्यवहारकर | वय ८२, | पुणे |
| ०४-३-१६ | श्री. विमलकांत सदानंद अजिंक्य | वय ९७, | मालाड |
| २३-३-१६ | सुजाता राजेंद्र गोरक्षकर, | वय ७३, | खार |
| २५-३-१६ | सौ. रजनी विनयशील देसाई, | वय ८२, | पुणे |
| २८-३-१६ | श्रीम. आशा गजानन जयकर, | वय ७८, | अंधेरी |

## प्रभुतरुणास देणगी

✶ सौ. अजिता राजन जयकर आणि श्री. राजन वामन जयकर यांजकडून त्यांची कन्या नेहा हिच्या विवाहाप्रीत्यर्थ रु. ५००१/-

✶ श्रीमती वृंदा शाम जयकरकडून त्यांची आई कै. सौ. विमल आणि वडील कै. श्री. माधव बाळाराम नायक यांच्या (२२ मार्च आणि ६ एप्रिल रोजी झालेल्या) २५व्या पुण्यतिथीप्रीत्यर्थ रु. १०००/-

✶ श्री. अरविंद धराधर यांजकडून नातू अर्णव याच्या यशाप्रीत्यर्थ रु. १०१/-

✳

## अभिनंदन

✶ प्रा. मंगला सरदेशपांडे यांचे एशियाटिक सोसायटीत 'द आयडिया ऑफ इंडिया इन मॉरिशिअन लिटरेचर विथ स्पेशल रेफरन्स टू द रायटिंग ऑफ आनंदादेवी' या विषयावर व्याख्यान झाले.

✶ आमचे व्यंगचित्रकार श्री. प्रदीप कोठारे यांना 'कार्टूनिस्ट कंबाईन्स' तर्फे व्यंगचित्रकारांच्या संमेलनात सहभागी होण्याचे आमंत्रण आले आहे. दादरच्या सावरकर सभागृहात चित्रकार रवी परांजपे यांच्या अध्यक्षतेखाली भरणाऱ्या या संमेलनात श्री. प्रदीप यांचा सहभाग असेल. यावेळी भरणाऱ्या प्रदर्शनात त्यांचे चित्र त्यांच्या माहितीसह असेल; शिवाय व्यंगचित्रस्पर्धेतही ते सहभागी होतील. १६, १७ एप्रिल रोजी हे दोन दिवसीय संमेलन होणार आहे. प्रदीप कोठारेंचे अभिनंदन आणि शुभेच्छा.

✶ आमचे लेखक श्री. विश्वास अजिंक्य यांचा 'करियर मार्गदर्शनपर लेख' लोकसत्तात प्रसिद्ध झाला.

✶ (सौ.) शिल्पा नवलकर यांना म. टा. सन्मान पुरस्कार 'सेल्फी' नाट्यलेखनासाठी प्राप्त झाला. 'बापसे बेटी सवाई' भविष्यातही होवो. अभिनंदन.

✶ 'टॉस' या नाटकातील विनोदी भूमिकेसाठी 'सर्वोत्कृष्ट विनोदी भूमिका' या पुरस्कारार्थ सौ. पूजा अजिंक्य यांना नामांकन मिळाले होते. अभिनंदन. पुढच्या वेळी पुरस्कार मिळवालच पूजाताई!

✶ 'शेखर खोसला कोण आहे?' या नाटकाच्या प्रकाशयोजनेसाठी श्री. शीतल तळपदे यांना झी नाट्यगौरव पुरस्कार प्राप्त झाला. अभिनंदन.

✶ श्री. सुरेन्द्र गजानन विजयकर यांनी २७ मार्च रोजी वयाची ७५ पूर्ण केली. तर स्वाती तारकनाथ जयकर यांनीही समाजसेवेचे कंकण बांधून वयाची ७५ पूर्ण केली. दोघांचेही अभिष्टचिंतन.

✶ श्री. मिलिंद मुकुंद कोठारे यांचा हॉटेल मॅनेजमेंटवर लेख प्रसिद्ध झाला.

✶ डॉ. रंजन देसाई यांचे लोकसत्तात वनस्पतीशास्त्रातील माहितीवर आधारित सदर प्रकाशित होते.

✶ कुमार अर्णव आलोक अरविंद धराधर याला १८ व्या नॅशनल सायन्स ऑलिंपियाडमध्ये आंतरराष्ट्रीय २३६ या क्रमांकाने, शहरात १३५ आणि पार्ले टिळक विद्यालयातून प्रथम क्रमांकाने यश मिळून सुवर्णपदक प्राप्त झाले. या सुवर्णपदकाचा मानकरी ठरल्याबद्दल पार्ले टिळक विद्यालयाच्या प्राचार्या स्वप्ना त्रिलोक्य यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. अर्णव शाळेचा 'व्हाइस कमाण्डो' ही आहे. त्याच्या 'यलो हाऊस'ची 'बेस्ट हाऊस' म्हणून निवड झाली तेव्हा त्याचे बक्षिस प्रमुख म्हणून अर्णवनेच स्वीकारले. अर्णवचे अभिनंदन. त्याला पुढील उज्जवल भविष्यासाठी शुभेच्छा.

✶ ब्रुसेल्स येथे दहशतवादी संघटनेने स्फोट घडवून आणला. या भयकारी अपघातप्रसंगी श्री. नंदादीप माधवराव जयकर आणि त्यांचे कुटुंबीय तेथे उपस्थित होते. ईश्वरकृपेने ही सर्व मंडळी मायदेशी सुखरूप परतली. 'महाराष्ट्र टाइम्स' मध्ये नंदादीपची या संदर्भात मुलाखतही आली होती.

✶ आमचे लेखक श्री, विनय त्रिलोकेकर हे गिरगावातील सेंट सॅबॅस्टियन शाळेच्या नवती सोहळ्यात अध्यक्ष म्हणून सन्मानित झाले.

## पाठारे प्रभु महिला समाज

### सहलवृत्त

✶ दि. २९ जानेवरी ते ३१ जानेवारी २०१६ या दरम्यान महिला समाजाची तीन दिवसीय सहल दापोली येथे जाऊन आली. ४५ महिलांनी या सहलीचा आनंद लुटला. २९ जानेवारीला पहाटे पाच वाजता गिरगावातून सहल सुरू झाली; खास लक्झरी वॉल्वो बसने सुरू झालेल्या या आनंदात विरारपर्यंत सर्व भगिनी सामील झाल्या. समाजाने तीन दिवसांच्या कार्यक्रमाची रूपरेषा सांगून अतिरिक्त खाऊचा खजिनाही त्यांना सुपूर्द केला. कर्नाळ्याला मस्त नाश्ता, नंतर सौ. बिंबा नायकांनी बनविलेले खास चीझ सॅण्डविचेस यामुळे उदरभरण झाले. दापोलीला 'सागर सावली' विश्रामगृहात वास्तव्य, नाश्ता, भोजन यांची 'सावली' भगिनींना लाभली. नाश्ता, भोजन अर्थातच शाकाहारी/मांसाहारी असे 'परभी चव' भागविणारे होते.

कोंकण प्रांत ज्यांनी निर्माण केला त्या परशुरामाचे मंदीर, तामसतीर्थ, चंडिका गुहामंदीर (दाभोळ) या स्थळांना भगिनींनी भेट दिली. दाभोळला फेरीबोटींचा फेरफटका, कड्याचा गणपती, आंजर्ले दापोलीचे कृषी विद्यापीठ आदी स्थळांना भेट देऊन भगिनींनी सहलीचा आनंद लुटला. अर्थात या आनंदात भर घालणारे हाऊसी, लकी ड्रॉ, पासिंग द पार्सल इ. खेळही घेण्यात आले. 'आम्हा वेड लागले सहलीचे, आम्हा वेड लागले दापोलीचे... ही सौ. साया नवलकरांची स्वरचित कविता त्यांनी गायिली तेव्हा 'आनंदाच्या वेडाला' उधाणच आले. विविध खेळांसाठी बक्षिसेही अर्थातच होती. सहलीला आलेल्या सर्वात ज्येष्ठ भगिनी श्रीम. सुशीला कोठारे यांच्या हस्ते हे बक्षिस वितरण झाले. यावेळी विश्वस्त वृंदा जयकर यांनी समारोपाचे कृतार्थतेचे मनोगत व्यक्त केले. परतीच्या प्रवासात भगिनींना पाली येथील गणपतीचेही दर्शन घडले.

या यशस्वी सहलीचे आयोजन सौ. बिंबा नायक यांनी केले होते. उपाध्यक्ष सौ. साया नवलकर, उपचिटणीस सौ. नूतन कीर्तिकर, खजिनदार कु. शोभना जयकर, सल्लागार सौ. उर्वशी धराधर, कार्यकारिणी समिती सदस्या सौ. उन्नती राणे आणि सौ. शिल्पा धुरंधर यांनी सहकार्य केले. पुढील सहलीची भगिनींनी निश्चितच वाट पहावी अशा पद्धतीने ही सहल 'सुहाना सफर' ठरली.

✶ पा. प्र. महिला समाजाची दि. २४-४-१६ रोजी दुपारी ४ वाजता पा. प्र. को. ऑप. हाऊसिंग सोसायटीच्या सांस्कृतिक सभागृहात विशेष सर्वसाधारण सभा आयोजित करण्यात आली आहे. सामाजाच्या विश्वस्त सौ. सरोज अंबर कोठारे यांचा राजीनामा मंजूर करणे आणि त्याजागी नवीन विश्वस्ताची नेमणूक करणे या दोन महत्त्वाच्या बाबी सभेपुढे कामकाज म्हणून विचारार्थ असतील.

सभा आवश्यक गणसंख्येच्या अभावी तहकूब करून त्याच ठिकाणी ४.३० वाजता घेण्यात येईल. प्रत्येक सभासदाने विशेष सर्वसाधारण सभेची अधिसूचना सोबत आणणे जरूरीचे आहे.

हे मासिक मुद्रक, प्रकाशक श्रीमती सुहासिनी कीर्तिकर यांनी मालक बोर्ड ऑफ कंट्रोल प्रभुतरुण करिता मे. स्नेहेश प्रिंटर्स, ३२०-अ, शाह अँड नाहर इंडस्ट्रीयल इस्टेट, अ-१, धनराज मिल कंपाऊंड, सीताराम जाधव मार्ग, लोअर परेल, मुंबई-४०००१३ येथे छापून पारिजात बी-३, युनियन बँक एम्प्लॉईज को-ऑप. हौ. सोसायटी, पटेल इस्टेट, जोगेश्वरी (प.), मुंबई-४००१०२ येथे प्रकाशित केले.

संपादक: श्रीमती सुहासिनी कीर्तिकर RNI NO. 14613/67